# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
## कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर
### ५३९,कसबा करवीर राजेंद्र नगर कोल्हापूर- ४१६ ००४

क्र.कोविमं/उमा/गोप/4354
कोल्हापूर ४१६००४
दिनांक- २४/०२/२०२३

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हा.

**विषय** - कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा इ. १२ वी परीक्षेच्या उत्तरपत्रिका परीक्षण / नियमन करण्यावर बहिष्काराबाबत

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रुवारी / मार्च २०२३ ची परीक्षा दि. २१/०२/२०२३ पासून सुरू झालेली आहे. सदर परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणीवर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनांनी बहिष्कार टाकलेला आहे. यासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, परीरक्षक केंद्रावरून आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या नावे उत्तरपत्रिकांचे पार्सल येणार आहे. सदरहू पार्सल्स शिक्षकांच्या बहिष्कारामुळे मंडळाकडे परत न पाठविता आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात सुरक्षितपणे ठेवण्यात यावीत. कोणत्याही परिस्थितीत पार्सल्स मंडळाकडे परत पाठविण्यात येवू नयेत. कनिष्ठ महाविद्यलय प्राध्यपकांचा ~~संप~~ बहिष्कार मिटल्यानंतर आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील परीक्षकांना सदर उत्तरपत्रिका तपासण्यासाठी देण्यात याव्यात उत्तरपत्रिका पार्सल्स परत पाठविल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील याची नोंद घ्यावी.

(पोवार डी.एस.)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.